CCE-III-RR/PR/NSR/NSPR(B)/222/9205

**B**

ಆಗಸ್ಟ್ 2024 ರ ಪರೀಕ್ಷೆ-3

**AUGUST 2024 EXAMINATION-3**

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]

Total No. of Printed Pages : 12 ]

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 45 ]

Total No. of Questions : 45 ]

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

**Code No. : 08-M**

**CCE RR/PR/ NSR/NSPR**
**Reduced Syllabus**

Question Paper Serial No.

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**(ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. / ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**

**(Regular Repeater / Private Repeater / NSR / NSPR)**

ದಿನಾಂಕ : 02. 08. 2024 ] [ Date : 02. 08. 2024

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-15 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-15 A.M. to 1-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

**Cut here/ಇಲ್ಲಿ ಕತ್ತರಿಸಿ** →

1. प्रश्न पत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्नपत्रिका ही विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती प्रश्नपत्रिका उघडावयाची आहे. **(बाणाने दर्शविलेल्या ठिकाणातून प्रश्नपत्रिका कापून उघडा.)** डाव्या बाजूने कापून प्रश्नपत्रिका उघडू नका. प्रश्नपत्रिकेमधील सर्व प्रश्न असलेली पाने व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पहा.
3. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या ही त्या प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शविते.
5. प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.
6. तुम्हाला देण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) आणि तुमच्या प्रवेशपत्रावर छापलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) दोन्ही एकच आहेत. याची खात्री करुन घ्या.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्नपत्रिका येथून कापून उघडा.**

**02. 08. 2024**

**Tear here**

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :** **6 × 1 = 6**

1. 'दुर्बळ' या संधीचा विग्रह असा होतो –

(अ) दुः + बळ (ब) दु + बळ

(क) दुर्ब + ळ (ड) दि + बळ

2. 'आदुने लाडू खाल्ला' या वाक्यातील काळ ओळखा.

(अ) भविष्यकाळ (ब) वर्तमानकाळ

(क) भूतकाळ (ड) पूर्ण भविष्यकाळ

3. 'शितावरून ............ परीक्षा.' म्हण पूर्ण करा.

(अ) ताकाची (ब) वरणाची

(क) दुधाची (ड) भाताची

4. 'दगडावर कोरलेला लेख' या शब्दसमूहासाठी एक शब्द हा आहे –

(अ) वस्त्रालेख (ब) शिलालेख

(क) ताम्रलेख (ड) पत्रालेख

5. 'आराध्या गाणे गाते' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ही आहे –

(अ) नाम (ब) सर्वनाम

(क) विशेषण (ड) क्रियापद

6. खालीलपैकी 'वृक्ष' या शब्दाचा समानार्थी शब्द हा आहे –

(अ) ढग (ब) वारा

(क) वेल (ड) झाड

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :** **4 × 1 = 4**

7. त, ई, आ : सप्तमी विभक्ती :: ऊन, हून : ..................

8. पोलिसांनी चोर पकडला : कर्मणी प्रयोग :: गाय चारा खाते : ..................

9. लंबोदर : बहुव्रीहि समास :: घरोघरी : ..................

10. साक्षर : निरक्षर :: ज्ञानी : ..................

**III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **7 × 1 = 7**

11. हत्तीला पाहण्यासाठी कोण गेले ?

12. हत्तीचे कान पाहणाऱ्यास हत्ती कसा वाटला ?

13. माणूस विद्येचा पुजारी केव्हा होईल ?

14. 'पाहुणे' ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून निवडली आहे ?

15. संत ज्ञानेश्वरांनी कोणत्या ठिकाणी संजीवन समाधी घेतली ?

16. 'धरण' कवितेतील स्त्री कशासाठी सारं रानं धुंडाळते ?

17. पाहुणे बाबांच्या पेटितून कशाचे जुडगे पळवितात ?

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा :** **3 × 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

    (अ) तारीफ करणे.

    (ब) इशारा देणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

    'विद्या ही महासागरासारखी आहे.'

20. गण पाडून वृत्त ओळखा.

    'उपवन जल केली जे कराया मिळाले.'

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **7 × 2 = 14**

21. हत्तीच्या दृष्टांत कथेचे तात्पर्य लिहा.

22. डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांचा थोडक्यात परिचय लिहा.

23. ''एक शूद्र बाई शिक्षिका म्हणून शिकवायला लागली. महाभयंकर !'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

24. वाटणीच्या घोळाने घरात काय-काय घडत होते ?

25. कवी कावळ्याला कोणकोणत्या गोष्टी देऊ करतो ?

26. कवी नरेंद्र पंडित यांचा थोडक्यात परिचय लिहा.

27. 'विठ्ठला विठ्ठला । आम्ही अन्नभक्त'

संदर्भासह स्पष्टीकरण करा.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** **1 × 3 = 3**

28. (अ) वनश्री हीच खरी धनश्री.

**किंवा**

(ब) जया अंगी मोठेपण तया यातना कठीण.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा :** **10 × 3 = 30**

29. ‘शील’ या गुणाचे महत्व आंबेडकरांनी कसे पटवून दिले आहे ?

30. सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी कशा होत्या ? ते लिहा.

31. गंगूबाईंनी संगीत शिक्षणासाठी कशाप्रकारे कष्ट घेतले ?

32. गणातात्यांना धाकट्या मुलाचा राग का येत होता ? सविस्तर लिहा.

33. ‘स्वरगंगा’ या पाठाच्या आधारे धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयाचे वर्णन करा.

34. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रूक्मिणी काय करणार आहे ?

35. धर्माच्या नावाखाली ढोंगी साधुचे वर्तन कसे असते ?

36. पाहुणे आणि दुखणी यातील साम्य कविने कसे सांगितले आहे ?

37. उद्योगी तरुण कसा असला पाहिजे ? का ?

38. ‘धरण’ या कवितेचा थोडक्यात आशय लिहा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

39. लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ?

**किंवा**

लेखकाने काकूंना कामावरुन काढून का टाकले ? सविस्तर लिहा.

40. 'जपानी स्त्री' या पाठाच्या आधारे जपानी स्त्रीचे स्वभाववैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

41. 'या भारतात बंधुभाव' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

कवच भूमिचे ..............................

..............................................

..............................................

............................. श्रद्धेचा अंकुर.

**किंवा**

कोसळली सर ................................

..............................................

..............................................

....................................... सत्कार.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

**1 × 4 = 4**

43. जनसेवा अनेक मार्गाने करता येते. कुणासाठी कष्ट करून तर कुणासाठी पैशाची मदत करून तर कोणाला कठीण प्रसंगी प्रत्यक्ष स्वतः वेळ देऊन इतरांची सेवा करता येते. कोणी दुःखी असेल तर आपल्या गोड स्वभावाने त्याच्या दुःखी मनाला फुंकर घालून ते कमी करण्याचा प्रयत्न करणे ही सुद्धा एकप्रकारची सेवाच होय. अशा सेवेची फळे अंती चांगलीच मिळतात. दीन, दुबळे, अनाथ, अपंग यांच्या रूपात परमेश्वराचे दर्शन घडते. प्रत्यक्ष परमेश्वर दिसतो. असा याचा अर्थ नाही.

परमेश्वर कोणत्याही स्वरूपात दिसत नाही. तो अमूर्त आहे. दुसऱ्याच्या सुखासाठी चांगले काम केले तर कळत नकळत आपल्या मनाला सात्विक समाधान मिळते आणि हे समाधान हाच परमेश्वराचा प्रसाद असतो. म्हणूनच 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' असे म्हटले जाते.

**प्रश्न :**

(अ) जनसेवा कोणकोणत्या प्रकारे करता येते ? 2

(ब) 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' असे का म्हटले जाते ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5**

44. तुमच्या लहान भावाला / बहिणीला वाचनाचे महत्व पटवून देणारे पत्र लिहा.

**किंवा**

दहावीचे गुणपत्रक मिळविण्यासाठी तुमच्या शाळेच्या मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.

**XI.** **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लेखन करा :**

**1 × 5 = 5**

45. (अ) आई थोर तुझे उपकार.

(ब) मी शिक्षक झालो तर !

DO NOT WRITE ANYTHING HERE